तात्काळ

क्रमांक :पीओएस-१०८५/विक-१-स्वा. सै.,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक - १२ एप्रिल १९८५

९३

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी.

विषय : स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना व पेन्शनधारक सहाव्या प्रवर्गातील स्वातंत्र्य सैनिकांना सन्मानपत्र देण्याबाबत.

महोदय,

आपणास माहित आहेच की, स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना व सहाव्या प्रवर्गातील भुमिगत पेन्शनधारक स्वातंत्र्य सैनिकांना नियमित सन्मानपत्र देण्याबाबतचे आदेश शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसपीटी-१०८४/१६११/विक-१-स्वा. सै., दिनांक १६/८/१९८४ अन्वये देण्यांत आले आहेत. तथापि सदरहू आदेशान्वये स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना व सहाव्या प्रवर्गातील पेन्शनधारक स्वातंत्र्य सैनिकांना नियमित सन्मानपत्र देण्याची कार्यवाही झालेली नाही, असे कळते. तरी, आपणास विनंती करण्यात येते की, कृपया याबाबतची कार्यवाही व्हावी. या पुढे याबाबतची तक्रार शासनाकडे येणार नाही, याची कृपया दक्षता घ्यावी.

आपला,

दा. प. कांबळे

[दा. प. कांबळे]

उप सचिव, महाराष्ट्र शासन.